महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
महाराष्ट्र शासनाची संस्था
Maharashtra Energy Development Agency (MEDA)
A Government of Maharashtra Institute

सत्यमेव जयते

आरईएन/अमरावती विभाग/सौर/२०२६ दि. ३ जून, २०२२

प्रति,
मे. अथर्व टेक्नोसिस्टीम,
कार्यालय क्र.१, प्लॉट क्र.३७, गट क्र.१३५,
सनवी मेडीकल जवळ, प्रथमेश नगरी,
देवलाई रोड, औरंगाबाद - ४३१ ००५.

**विषय :- नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत वाशीम जिल्ह्यातील २२ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी ४ कि. वॅ. क्षमतेचे असे एकूण ८८ कि. वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प (बॅटरी बॅकअपसह) आस्थापित करण्यासाठी मे. अथर्व टेक्नोसिस्टिम्स, औरंगाबाद यांना निर्गमित केलेले कार्यादेश रद्द करुन त्यांच्या कंपनीचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याबाबत.**

संदर्भ :-

१ कार्यादेश क्र. आरईएन/अकोला/डीपीडीसी वाशीम/२२ पीएचसी/१६९/२०१९-२०/२६१ दि. १९.०९.२०१९.
२ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२०-२१/९४ दि.२५.०२.२१.
३ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२१-२२/३५० दि.०६.०७.२१.
४ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२१-२२/३८४ दि.२९.०७.२१.
५ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२१-२२/४८३ दि.३०.०९.२१.
६ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२१-२२/५१८ दि.०१.११.२१.
७ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२१-२२/६१३ दि.२८.१२.२१.
८ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९-बी/२०२१-२२/६५९ दि.२८.०१.२२.
९ महाऊर्जा जिल्हा कार्यालय अकोला यांचे पत्र क्र.जि.का.अ./प्रा.आ.कें.वा./नस्ती क्र.१६९/२०२१-२२/६९२ दि.११.०२.२२.
१० महाऊर्जा विभागीय कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र.जा.क्र./मेडा./अम./सोलर-I-अ१-९६/२०२१-२२/१९९ दि. ३१.०३.२०२२.

महोदय,

नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत वाशीम जिल्ह्यातील २२ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी ४ कि. वॅ. क्षमतेचे असे एकूण ८८ कि. वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प (बॅटरी बॅकअपसह) आस्थापित करण्यासाठी आपणास एकूण रु.१,०८,४०,८३०/- रक्कमेचा कार्यादेश देण्यात आला. कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार २२ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आस्थापित केलेल्या पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्पाचे ८० टक्के देयक रु.८६,७२,६६४/- इतके अदा करण्यात आले.

सदरील प्रकल्पाचा महाऊर्जा विभागीय कार्यालयांमार्फत करण्यात आलेल्या सौर संयंत्र तपासणी कामाचा सद्य:स्थिती अहवाल खालीलप्रमाणे :-

- आपणास ८० टक्के देयक अदा कारण्यात आले असून आपणामार्फत सदरचे सर्व प्रकल्प नेट मीटरसह आस्थापित करून कार्यान्वित करणे गरजेचे होते. कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार सदर सर्व प्रकल्प कार्यान्वित करण्याची व ५ वर्ष देखभाल दुरुस्ती करण्याची सर्वस्वी जबाबदारी आपली होती. तथापि, आपणाकडून काम

पूर्णत्वाबाबत कुठलीही कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले असल्याचे महाऊर्जा जिल्हा कार्यालय, अकोला यांनी कळविले.

- सर्व प्रकल्प कार्यादेशाच्या अटी व शर्तीनुसार नेट मिटरसह आस्थापित व कार्यान्वीत करून प्रकल्प निहाय सद्य:स्थिती अहवाल सादर करणेबाबत वेळोवेळी आपणास कळविणेत आले होते. परंतु आपल्यामार्फत याबाबत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद मिळाला नसून कोणताही अहवाल अद्यापर्यंत प्राप्त न झाल्याचे महाऊर्जा जिल्हा कार्यालय, अकोला यांनी कळविले आहे.
- सदर सौर संयंत्राची तपासणी केली असता मोठया प्रमाणात त्रुटी आढळून आल्या आहेत व प्रकल्प आस्थापनेच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे देखभाल व दुरुस्ती विषयक कामे केली गेली नसल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र प्रतिनिधी यांनी सांगितल्यानुसार निदर्शनास आले असल्याचे महाऊर्जा जिल्हा कार्यालय, अकोला यांनी कळविले आहे.

त्यानुसार प्रलंबित सौर संयंत्रे आस्थापित करुन नेट मीटर आस्थापनेबाबत कार्यवाही करुन त्याचा अहवाल सादर करण्याबाबत आपणांस पत्रांद्वारे वारंवार सुचना देऊन देखील आपणांकडून नेट मीटर आस्थापित करण्यात आलेला नाही. त्यामुळे आपण सदरचे काम करण्यास इच्छुक नसल्याचे निदर्शनास येत असून ही अत्यंत खेदजनक बाब आहे. यामुळे लाभार्थी संस्था व महाऊर्जा यांच्या वेळेचे व आर्थिक नुकसान झालेले आहे.

यावरुन असे दिसून येते की, आपण शासनाच्या अंगिकृत संस्थेची दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट होते. अशा प्रवृत्तीला अटकाव घालण्याकरिता यापुढे महाऊर्जामार्फत आपली कंपनी व प्रकल्पांना कोणतीही संमती न देता आपणाकडील प्रलंबित प्रकल्पांची कामे रद्द करण्यात येत आहे. आपल्याला कळविल्यानुसार सदरच्या प्रलंबित प्रकल्पांसाठी येणार खर्च या प्रकल्पातील महाऊर्जाकडे शिल्लक निधी व आपण जमा केलेली सुरक्षा ठेव यामधून करण्यात येणार आहे. त्याकरिता आपण जमा केलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येत आहे.

शासनाची दिशाभूल व फसवणूक करणे या कारणाने आपल्या कंपनीचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येत असून यामुळे होणाऱ्या नुकसानास संपूर्णपणे आपण जबाबदार आहात. तसेच आपल्या कंपनीस यापुढे महाऊर्जामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या निविदांमध्ये सहभागी होता येणार नाही याची नोंद घ्यावी.

महाव्यवस्थापक (सौर)

प्रत :-

| | | |
|---|---|---|
| १) सह सचिव,<br>नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार,<br>नवी दिल्ली. | ----- | यांना माहितीस्तव सादर. |
| २) All State Nodal Agency / DISCOM's / State Government Departments -------- | ----- | यांना देऊन कळविण्यात येते की आपणामार्फत प्रसिद्ध होणाऱ्या निविदांमध्ये मे. अथर्व टेक्नोसिस्टिम्स, औरंगाबाद यांना सहभागी करुन घेण्यात येऊ नये. |

३) जिल्हाधिकारी, ----- यांना माहितीस्तव.
सर्व जिल्हाधिकारी कार्यालये

४) आयुक्त / मुख्याधिकारी, ----- यांना माहितीस्तव.
सर्व महानगरपालिका / नगर पंचायत / नगर परिषद

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, ----- यांना माहितीस्तव.
सर्व जिल्हा परिषद,

६) प्रादेशिक संचालक / विभागीय महाव्यवस्थापक / व्यवस्थापक, ----- यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव.
सर्व महाऊर्जा प्रादेशिक / विभागीय / जिल्हा कार्यालये,